# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.10.2025** **वार-शुक्रवार**

---

**सरदार वल्लभ भाईपटेल**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्तानं पुणे जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. पुणे महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांच्या हस्ते वल्लभभाई पटेल त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. पुणे रेल्वे विभाग आणि आंबेगाव पोलीस स्टेशन तर्फे राष्ट्रीय एकता दौड अंतर्गत मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं. सहभागी स्पर्धक, विद्यार्थी, नागरिक तसंच पोलीस स्टेशन अधिकारी अंमलदार यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आलं.

तसंच येत्या २ नोव्हेंबरला एकता दौड महा मॅरेथॉन आयोजित करण्यात आली आहे. मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धक, नागरिकांच्या सोयीसाठी पुणे मेट्रोनं प्रवासी फेऱ्यांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. २ नोव्हेंबरला पहाटे ३ वाजल्यापासून मेट्रोच्या फेऱ्या सुरू होणार असून, पहाटे तीन ते सहा या कालावधीत दोन्ही मार्गांवर दर १५ मिनिटांनी मेट्रो सेवा उपलब्ध असेल. त्यानंतर मेट्रो सेवा नियमित वेळेनुसार सुरू राहील.अशी माहिती पुणे मेट्रोनं दिली आहे.

**वंदेमातरम**

शासनाच्या निर्देशानुसार ७ नोव्हेंबर २०२५ ला "वंदे मातरम" या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सर्व तालुक्यांमध्ये सामूहिक वंदेमातरम् गायनाचं आयोजन करण्यात आलं आहे. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी यासाठी उपस्थित राहाण्याचं आवाहन पुण्याच्या तहसीलदारांनी केलं आहे.

**<u>राष्ट्रीयचिंतनशिबिर</u>**

मसुरीतल्या भारत सरकारच्या भूमी संसाधन विभागाच्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी आणि पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी म्हणजेच यशदा सहकार्यानं, 'महसूल न्यायालयीन खटले व्यवस्थापन प्रणालींचं आधुनिकीकरण' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चिंतन शिबिराचं आयोजन यशदा इथं करण्यात आलं आहे. देशभरात समान भूमी अभिलेख प्रणाली लागू असली तरीही, प्रत्येक राज्यात दुरूस्ती आणि बदल प्रक्रियेच्या पद्धती बदलतात. परिणामी ही प्रक्रिया वेळखाऊ आणि गुंतागुंतीची होत असल्याचं भूमी संसाधन विभागाचे सचिव मनोज जोशी यांनी नमूद केलं.

**<u>ऊस गाळप हंगाम</u>**

राज्यातले सहकारी आणि खासगी कारखाने उद्या पासून सुरू करण्यास राज्य सरकारनं अनुमती दिली आहे. त्यानुसार ऊस गाळप हंगाम सुरू होण्यास चार दिवस राहिले आहेत. मात्र गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्यात ठिकठिकाणी झालेल्या अवकाळी पावसामुळं उसाच्या शेतात पाणी साचलं असल्यानं उसतोडणीला अडथळा निर्माण होणार आहे. याचा विपरीत परिणाम साखर कारखान्याच्या गळीत हंगामावर होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे गळीत हंगामाची तयारी पूर्ण होऊनही साखर कारखान्यांसाठी ही चिंतेची बाब झाली आहे.

**<u>ऊसतोडबंधमुक्त</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यात ऊसतोडणीस गेलेल्या कामगारांना मौजे राहु इथ बंधक बनवलं असल्याची तक्रार अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील मानेवाडी इथल्या नाना जाधव यांनी पुण्याच्या जिल्हा विधी सेवा समिती आणि जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडं केली होती. या प्रकरणी २७ उसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना मुक्त करून त्याच्या मूळ गावी रवाना करण्यात आलं आहे. या प्रकरणी जिल्हा विधी सेवा समितीनं एक चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, संबंधित जमीनमालक हिरामण गणपत गाढवे यांच्याविरुद्ध यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<u>शिक्षण</u>**

पुणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी साडेचार कोटी रुपयांची पुस्तके विनानिविदा खरेदी करण्याचा महापालिकेच्या शिक्षण विभागानं ठेवलेला प्रस्ताव स्थायी समितीतर्फे आज रद्दबातल करण्यात आला.  पुणे महापालिकेच्या शाळेतील इयत्ता दुसरी ते पाचवीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, गणित, इंग्रजी, बुद्धिमत्ता, संगणक या विषयांच्या लेखन सरावासाठी व्यवसाय पुस्तके खरेदीचा निर्णय महापालिका प्रशासनानं घेतला होता. विद्यार्थ्यांचं अर्धे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर पुस्तक खरेदीचा निर्णय घेण्यात आल्यानं याबाबत आक्षेप घेण्यात येत होता.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह आणि परवाना विभागाकडून अनधिकृत फ्लेक्स बॅनर यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. शहरातील एकूण आठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पथके तयार करून ही कारवाई केली जात आहे. आत्तापर्यंत तब्बल साडेएकवीस हजार फलक जप्त करण्यात आले आहे. ज्या जागा राखीव आहेत त्याच ठिकाणी फलक लावावेत असं आवाहन पालिका उपायुक्त राजेश आगळे यांनी केलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. कमाल तापमान २८ तर किमान तापमान १९ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**